
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL
AJANTA
Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
Marathi Part - I
Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com
Ajanta Prakashan

CamScanner

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १३ | मराठी संत साहित्यातील मुक्ताईचे योगदान<br>प्रा. डॉ. ए. बी. बोरे | ५०-५५ |
| १४ | भारतातील लघु उद्योग क्षेत्रातील समस्या<br>प्रा. डॉ. बी. आर. शिंदे | ५६-६८ |
| १५ | पर्यटनाचे व्यवसायावर परिणाम करणारे घटक<br>डॉ. पवार बाळासाहेब शिवाजी | ६९-७२ |
| १६ | बचत गट : काळाची नवीन गरज<br>प्रा. अमिता प्रेमराज भोळे | ७३-७७ |
| १७ | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल<br>प्रा. डॉ. किशोर काळप्पा शेट्टी | ७८-८२ |
| १८ | सार्वत्रिक शिक्षणाच्या सक्षमीकरणात्मक आव्हानांचे अध्ययन<br>प्रा. डॉ. मालती बोलीराव वायसी | ८३-८८ |
| १९ | बालोपासना : संत जनाबाईंची काव्य रचना<br>प्रा. डॉ. चंद्रशेखर म. सोंडगे | ८९-९३ |
| २० | महाराष्ट्रातील संत साहित्य - ज्ञानेश्वरीतील भक्तीधर्म<br>रामेश्वर माहेकराव इंडे | ९४-९७ |
| २१ | महाराष्ट्राची लोकसंख्या<br>डॉ. आर. बी. गायके | ९८-१०१ |
| २२ | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>प्रा. डॉ. शुभांगी लक्ष्मणराव शिंदे | १०२-१०६ |
| २३ | पर्यावरण समस्या आणि भविष्यातील वेध<br>Dr. Banjara Dilip Lalu | १०७-१०९ |
| २४ | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल<br>प्रा. डॉ. शिंदे ज्ञान भागवत | ११०-११२ |
| २५ | पर्यावरण संवर्धनात प्रसार माध्यमांची भूमिका<br>प्रा. विजय मनुरकर | ११३-११५ |

# १४. भारतातील लघु उद्योगा समोरील समस्या

प्रा. डॉ. बी. आर. शिंदे
वाणिज्य विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.

**सार**

भारतातील लघु उद्योग हा महत्त्वाचा उद्योग असुन तो भारताच्या आर्थिक विकासात महत्वाचा घटक आहे. या उद्योगात परंपरेने चालत आलेले उद्योग आणि आधुनिक लघु उद्योग असे दोन प्रकार आढळून येतात. पारंपारिक उद्योग हे देशातील ग्रामीण भागात अस्तित्वात असुन हे उद्योग शेती क्षेत्रावर आधारीत आहेत. या उद्योगाचा आकार लहान असुन त्यांना भांडवल कमी लागते. हे उद्योग चालविण्यासाठी कोणतेही कौशल्य लागत नाहीत म्हणजेच अप्रशिक्षित व्यक्ती सुद्धा हे उद्योग चालवतात. परंतू आधुनिक लघु उद्योगात आधुनिक तंत्रज्ञाचा वापर केला जातो. या उद्योगात पारंपारिक उद्योगाच्या तुलनेत भांडवल जास्त लागते. म्हणजे भारत सरकारच्या तरतुदी नुसार या उद्योगात भांडवल गुंतवणूक १ कोटी रूपया पर्यंत असते. तर पुरक व साहाय्यक व्यावसायासाठी ७५ लाख रूपया पर्यंत गुंतवणूक करता येते. १९७७ मध्ये भारत सरकारने या उद्योगात अति लघु उद्योग हा एक नविन प्रकार निर्माण करून त्यात लोकसंख्या व भांडवल गुंतवणूक हे दोन निकष वापरण्यात आले.

स्वातंत्र्यानंतर भारतातील औद्योगिक विकासात लघु उद्योगाची भूमीका महत्वाची राहीली. म्हणून आल सरकारने लघु उद्योगाच्या बाबतीत वेगवेगळ्या तरतुदी करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या उपाय योजना केल्या असून गेल्या चार-पाच दशकामध्ये औद्योगीक धोरण ठरवताना लघु उद्योगाचा विचार करण्यात आला. या उद्योगाच्या विकासासाठी वेगवेगळ्या तरतुदी करून अनेक सोयी व सवलती देण्यात आल्या. परंतु लघु उद्योग समोरील समस्या संपता संपत नविन आजही अनेक उद्योग आजारी तर काही उद्योग बंद पडलेल्या अवस्थेत आढळून येतात. म्हणून आपणांस लघु उद्योगा समोरील समस्या चा लेखात अभ्यासावयाच्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

### १. कच्या मालाची समस्या

भारतातील लघु उद्योग हे ग्रामीण भागात असुन ते शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. या उद्योगाला वस्तुचे उत्पादन करण्यासाठी लागणारा कच्चा माल ग्रामीण भागात शेतीत निर्माण होतो. त्यामुळे या उद्योगांना कच्या मालाच्या समस्येला तोंड देण्याची गरज पडली नाही पाहिजे. परंतु या उद्योगा समोर कच्या मालाची समस्या सतत उद्भवते. कारण या उद्योजकाकडे माल साठा करण्यासाठी पैसा आणि साठवणूक करण्याच्या सुविधा नसतात. या उद्योगाला लागणारा कच्चा माल स्थानिक व्यापारी /सावकार खरेदी करून ठेवतात. हा माल जेव्हा लघु उद्योजकांना लागतो तेव्हा तो त्या मालाचा पुरवठा करतो. परंतू मालाचा पुरवठा करताना तेजी मंदी निर्माण करून अवाजवी किंमतीला त्यांना विकला जातो. एवढेच नाहीतर माल विकताना अनेक

अटी घालतात. णाल मी दर्जाचा देतात. त्याचा परिणाम व्यवसायाच्या होतो म्हणजेच वस्तूचे उत्पादन कमी होते. वस्तू हलक्या दर्जाच्या निर्माण होतात. श्रमीकांच्या कार्य शक्तीवर परिणाम होतो. आणि व्यावसाय तोट्यात जाऊ शकतात. अशा अनेक समस्या कच्या मालामुळे लघु व्यावसायात निर्माण होतात.

**२. भांडवलाचा अभाव**

भांडवल हा उद्योग किंवा व्यावसायाच्या विकासाचा पाया आहे. भांडवलावर उद्योगाचा विकास अवलंबून असतो. उद्योगाच्या व्याप्तीनुसार उद्योगाला भांडवलाची गरज भासते. लघु उद्योगाची व्याप्ती ही कमी असते. या उद्योगाला भांडवल कमी व श्रम जास्त लागतात. परंतू या उद्योगाला भांडवल कमी लागत असुन सुद्धा ते वेळेवर मिळत नाही. बँका सुद्धा अशा उद्योगाला पतकतर नाहीत. बँकरंली भांडवल पुरवठा करण्याची तयारी दर्शविली तर त्यात अनेक जाचक अर्थ घातल्या जातात. अशा वेळी या उद्योजकाला खाजगी सावकाराकडून, मित्रा कडून किंवा नातेवाईकाकडून पैसे घ्यावे लागततात असे कर्ज घेतान लघु उद्योजकाना जास्तीचा खर्च करावा लागेल तेव्हा वस्तूच्या उत्पादनावरील खर्च वाढत जातो. व उत्पादीत वस्तू पासून मिळणारे उत्पादन कमी होते. त्याचा परिणाम व्यावसायावर होतो. व्यावसायिकाला उत्पादनावर झालेला खर्च काढून लघु उद्योगाचा विस्तार करणे शक्य होत नाही म्हणून हे उद्योग लहान राहतात.

**३. विजेच्या पुरवठ्याची समस्या**

लघु उद्योजकाना वस्तूची निर्मिती करण्यासाठी उर्जा आवश्यक असते. ती उर्जा कोळसा वरची असो किंवा विजे पासुनची असो. आणि त्या विजेचा पुरवठा नियतीत व योग्य किंमतीत होणे आवश्यक आहे. परंतु हे उद्योग ग्रामीण असल्यामुळे विजेच्या पुरवठ्यात अनियमितता येते. आणि विजेचे दर सुद्धा जास्त असतात. त्याचा परिणाम उत्पादनावरील खर्च वाढतो उद्योगाचा नफा कमी होवून अनेक समस्या निर्माण होतात.

**४. जुणी व्यवस्थापण पद्धती**

लघु उद्योगाचे अस्तीत्व ग्रामीण असल्यामुळे या उद्योगात आजही आधुनिकता दिसत नाही. ती पारंपारिक दिसते म्हणून लघु ग्रामीण उद्योगात आज ही व्यवस्थापक असतात. ते अप्रशिक्षीत असततात. त्यामुळे अशा प्रकारचे व्यावसाय व्यवस्थापणाच्या फायद्या पासुन कायमचे दूर राहतात. त्याचा परिणाम व्यावसायावर होवून व्यवस्थापण विषयक समस्या निर्माण होतात.

**५. कालबाह्य यंत्रसामग्री**

लघु उद्योगात कालबाह्य किंवा जुनाट झालेल्या यंत्र सामग्रीचा वापर केला जातो. त्याचा परिणाम कामगाराच्या कार्यक्षमतेवर, वस्तूच्या दर्जावर होतो. वस्तूचा दर्जा चांगला नसल्यामुळे त्या वस्तुला बाजारपेठेत योग्य किंमत मिळत नाही. त्या उद्योगाला मिळणारे उत्पादन कमी मिळते. त्याचा परिणाम उद्योगाच्या आर्थिक उत्पन्नावर होतो. त्यामुळे व्यावसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे त्यांना परवडणारे नसते. म्हणून व्यावसायात अनेक समस्या निर्माण होतात.

CamScanner

**६. वस्तूच्या विक्रीची पद्धत पारंपरिक**

लघु उद्योगात उत्पादन व त्या उत्पन्नाचा दर्जा चांगला नसतात. त्यामुळे हा उद्योग वस्तू विक्रीच्या अनेक समस्येतून बाहेरि पडत नाही. उत्पादनाचा दर्जा चांगला नसल्यामुळे तयार माल बाजार पेठेत विक्रीसाठी नेला असता त्याला अनेक समस्याला तोंड द्यावे लागते. लघु उद्योगाकडे वस्तूच्या विक्री साठी योग्य व्यवस्थापण नसते. त्याच्या वस्तूची जाहीरात नसते. तेव्हा अशा उद्योगाना वस्तूची वस्तूची विक्री करण्यासाठी दुसऱ्या संस्थावर अवलंबून राहावे लागते. या संस्था अभिकर्ता म्हणून काम करतात. हे अथिकर्ते त्यांच्या इच्छेनुसार वस्तू विक्री करतात. लघु उद्योजंकाला वस्तूला योग्य किंमत दिली जात नाही. तो पैसा हप्त्या हप्त्याने द्यावा लागतो. यातून अशा उद्योगाची पिळवणूक होताना दिसते.

**समारोप**

लघु उद्योग हा भारतातील पारंपरिक व महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगाकडे भारत सरकारने लक्ष दिले, कायदे तयार केले आणि कायद्याचे काटेकोर पणे पालन केले तर या उद्योगातील समस्या सोडवता येतील. हा उद्योग भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वाचा ठरेल व देशातील बेकारीचे प्रमाण कमी होईल.

**संदर्भ**

१. व्यावसायिक अर्थशास्त्र – डॉ. आर. कृष्णकुमार.
२. भारतीय अर्थव्यवस्था – भांबरे.
३. औद्योगीक अर्थशास्त्र – रायखेलकर.
४. उद्योजकता विकास – जयंत जोशी.
५. औद्योगीक अर्थशास्त्र – झांबरे.
६. www.Indian Economy.in